**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 08.10.2021.**

**म.रा.वि.वि.कंपनी, शहर उपविभाग क्रं.1, जालना येथील 1)श्री.शिवहरी भानुदास वाघ, वय 31 वर्षे, व्यवसाय नोकरी वरिष्ठ तंत्रज्ञ, व 2)श्री.उध्दव लिंबाजी मगर, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.अकोला निकळ्क, ता.बदनापुर, जि.जालना(खाजगी ईसम) यांना 500/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1)श्री.शिवहरी भानुदास वाघ, वय 31 वर्षे, व्यवसाय वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.कंपनी, शहर उपविभाग क्रमांक-1,जालना, रा.वंजार उम्रद, ता. जि.जालना, हमु.माऊलनगर अंबडरोड जालना, 2)श्री.उध्दव लिंबाजी मगर, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा.अकोला निकळ्क, ता.बदनापुर, जि.जालना हमु. गणपती मंदीरासमोर शिक्षक कॉलनी, मोंढारोड जालना (खाजगी ईसम) |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि. 08.10.2021 रोजी 13.55 वाजेच्या सुमारास कल्पना हॉटेल मध्ये सत्कर कॉम्प्लेक्स जालना येथे. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 500/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, तक्रारदार यांचे मालकीचे जालना अंबड रोडवर पत्र्याचा गाळा असुन सदर गाळ्यामध्ये यापुर्वी म.रा.वि.वि.कंपनी कडुन इलेक्ट्रीक मिटर घेतलेले असुन सदर मिटर थ्री फेज वरुन असल्याने त्याचे विजबिल जास्तीचे येत असल्याने सदर मिटर काढुन टाकण्यासाठी म.रा.वि.वि.कं.शहर उपविभाग क्र.-1 जालना येथे दिनांक 07.10.2021 रोजी रितसर अर्ज दिला होता. त्यावरुन मराविवि.कार्यालयातील अभियंता यांनी आज पायेतो मिटर रिडींग प्रमाणे विजबिल भरणा करण्याचे सांगितल्याने मिटर रिडींग प्रमाणे विज बिल भरुन त्याची पवती घेऊन अभियंता यांना मिटर काढुन घेण्यास विनंती केली असता त्यांनी तक्रारदार यांचे विभागातील तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ यांना भेटुन मिटर काढुन घेण्यास सांगितले.

त्यानंतर तक्रारदार हे विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ यांना दिनांक 07.10.2021 रोजी भेटुन मिटर काढुन घेण्यास सांगितले असता विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ व त्यांचे सोबतचा कामगार उध्दव मगर यांनी मिटर काढुन घेण्यासाठी पाचशे रुपये लागतील असे सांगितले होते.

तसेच त्यावरुन तक्रारदार यांनी दिनांक 08.10.2021 रोजी विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ, व त्यांचे सोबतचा कामगार उध्दव मगर यांनी तक्रारदार यांचे अंबडरोडवरील पत्र्याचे गाळ्यातील विज मिटर काढुन घेण्यासाठी 500/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ व उध्दव मगर यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यांने त्यांनी दिनांक 08.10.2021 रोजी ॲन्टी करप्शन जालना विभागाला तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.08.10.2021 रोजी म.रा.वि.वि.कं.शहर उपविभाग क्रमांक-1,जालना येथे जावुन विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ व सोबतचे उध्दव मगर यांना भेटुन पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पंचा समक्ष शिवहरी वाघ यांचे सोबतचे कामगार उध्दव मगर यांनी तक्रारदार यांचेकडे अंबड रोडवरील पत्र्याचे गाळ्यामधिल पुर्वीचे विज मिटर काढुन घेण्यासाठी 500/-रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार यांचे कडुन आज दिनांक 08.10.2021 रोजी विज तंत्रज्ञ श्री.शिवहरी वाघ यांनी पंचासमक्ष 500/- रुपये लाचेची रक्कम स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. आलोसे 1) श्री.शिवहरी भानुदास वाघ, वय 31 वर्षे, व्यवसाय वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.कं.शहर उपविभाग क्रमांक-1,जालना, रा.वंजार उम्रद, ता.जि.जालना, 2) श्री.उध्दव लिंबाजी मगर, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी कामगार,(खाजगी ईसम) रा.अकोला निकळ्क, ता.बदनापुर, जि. जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.9823365677, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823216788, 8390757835 वर संपर्क करावा.**

(एस.एस.शेख)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.